महाराष्ट्र शासन

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

१८ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई - ३२.

क्र.आस्थाप-२०२५/प्र.क्र.१९१/आस्थापना

दि. २९ मे, २०२५

प्रती

संचालक (माहिती तंत्रज्ञान),
सामान्य प्रशासन विभाग,
७ वा मजला, विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई-३२

**विषय:-** शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्याबाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयावरील पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाची जाहिरातीची प्रत सोबत जोडली आहे. सदर जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाची आहे. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | कार्यालयाचे नाव | सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय विस्तार इमारत, २ रा मजला, दालन क्र. २१७, मंत्रालय, मुंबई |
| २ | प्रसिद्धीस देण्याची तारीख | ३० मे, २०२५ |
| ३ | कामाचे ठिकाण | मंत्रालय, मुंबई |
| ४ | देयक कोणाचे नावे अदा करण्यासाठी पाठवावयाचे | कार्यालयाच्या पत्त्यावर. |

आपली,

(शाहीन स्वा. शेख)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

१८ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई - ३२.

क्र.आस्थाप-२०२५/प्र.क्र.१९१/आस्थापना दि.२९ मे, २०२५

## (मंत्रालयीन अवर सचिव संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची कंत्राटी/करार पध्दतीने नियुक्तीची जाहिरात)

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ या विभागामध्ये शास्त्रज्ञ श्रेणी-१, शास्त्रज्ञ श्रेणी-२ व संचालक संवर्गाचे सेवा प्रवेश नियम तसेच इतर सेवा विषयक कामकाजासाठी मंत्रालयीन सेवानिवृत्त अवर सचिव संवर्गातील एका अधिकाऱ्याची करार/कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे. सदर पदांसाठी अर्हता व पात्रतेच्या अटी खालीलप्रमाणे आहेत-

### नियुक्तीबाबत अटी व शर्ती

१) कंत्राटी तत्वावरील पद हे शासन सेवेतील नियमित पद नाही.

२) अर्जदार शासनाच्या मंत्रालयीन सेवेतून अवर सचिव म्हणून निवृत्त झालेला असावा.

३) अर्जदाराचे वय दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी ६५ वर्षे पेक्षा जास्त नसावे.

४) उपरोक्त कामांसाठी लागणारी विशेष अर्हता मुलाखतीद्वारे तपासण्यात येईल.

५) इंग्रजीचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.

६) अर्जदार शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.

७) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणत्याही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

८) अर्जामध्ये अर्जदाराने त्याची वैयक्तिक माहिती पुरवावी (शैक्षणिक अर्हता, कायम व सध्याचा पत्ता पुराव्यासह, पासपोर्ट साईज ३ फोटो, व अनुषंगिक माहिती)

९) या पदावर निवड झालेल्या उमेदवारास शासन सेवेत नियमित करण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.

१०) कंत्राटी पध्दतीने नियुक्ती झालेल्या उमेदवाराचे कामकाज कोणत्याही वेळी असमाधानकारक आढळल्यास मा.सचिव (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांच्या मान्यतेने एक महिन्याची पूर्वसुचना देऊन सेवा समाप्त करण्यात येईल.

११) निवड करण्यात आलेल्या अधिकाऱ्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र. क्र.१००/१३, दिनाक १७ डिसेंबर, २०१६ व दि.०८.०९.२०२३ मधील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक व भत्ते अनुज्ञेय राहील.

१२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १७/१२/२०१६ मधील नमुद सर्व अटी व शर्ती सदर नियुक्तीस लागू राहतील.

१३) वर नमुद केल्याप्रमाणे अर्हता धारण केलेल्या व अटी पूर्ण करणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी अवर सचिव पदासाठी आपले अर्ज सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, विस्तार इमारत, २ रा मजला, दालन क्र. २१७, मंत्रालय, मुंबई यांच्या नावे सिलबंद लिफाफ्यात दिनांक.१५ जून, २०२५, सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत पाठवावेत. प्राप्त अर्जाची छाननी केल्यानंतर अर्जदारांना मुलाखतीचा दिनांक व वेळ स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

(शाहीन स्वा. शेख)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

D:\Sandeep Jadhav\अवर सचिव करार पद्धतीने नियुक्तीची जाहिरात.docx

प्रशासकीय विभागाचे नाव- पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

जाहिरातीचे शिर्षक-

मंत्रालयीन अवर सचिव संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची कंत्राटी/करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

Title of Advertise-

Regarding appointing Under Secretary on contract/Agreement basis from retired Under Secretary cadre of Mantralaya.